## जयसिंगपूर उदगांव सहकारी बँक लि., जयसिंगपूर

प्रधान कार्यालय १० वी गल्ली जयसिंगपूर

शाखा :-

### ए. टी. एम. कार्ड अर्ज

मी / आम्ही, आपले बँकेत असणाऱ्या माझ्या / आमच्या खालील खात्याकरिता ए. टी. एम. मशीन सेवेसाटी अर्ज करीत आहे / आहोत.

**खात्यासंबंधी माहिती**

फोटो

खाते / नं. :- ____________

खात्यांचा प्रकार :- ____________

टीप :- सदरची सवलत ही संयुक्तरित्या अधिकाराने व्यवहार करणेच्या, भागीदारी फर्म किंवा इतर कोणतीही बॉडी कार्पोरेट आणि अज्ञानाचे नांवाने इ. संयुक्त खात्यासाठी दिली जाणार नाही तथापि दोघांचे नांवाने असलेल्या संयुक्त खात्यासाठी ए.टी.एम. कार्ड हे पहिले नांव असणाऱ्या खातेधारकास दिले जाईल.

### अर्जदाराची माहिती

खातेदाराचे / पहिले नांव असलेल्या / फर्मचे नांव श्री. / मे. :- ____________

ए.टी.एम. कार्डावरील नांव :- ____________

पोष्टाचा पत्ता :- ____________

ऑफिस पत्ता :- ____________ ई-मेल :- ____________

टेलिफोन नं. :- ____________ पिन नं. :- ____________

मोबाईल :- ____________

### डिक्लेरेशन

मी/ आम्ही सदर अर्जाच्या मागे असलेल्या बँकेच्या अटी आणि शर्ती व याबाबतचे नियम वाचले असून ते आम्हाला पुर्णपणे समजले आहेत. मी/आम्ही सदरच्या अटी/शर्ती नियम स्विकारत असून त्या मला / आम्हाला मान्य व कबुल असून त्यास व त्यामध्ये / वेळोवेळी होणाऱ्या भावी बदलास आम्ही बांधील आहोत.

अधिकृत व्यक्तीची सही ____________ तारीख :- / /

अधिकृत व्यक्तीची सही ____________ तारीख :- / /

(संयुक्त खात्यासाठी सर्व व्यक्तींनी सह्या केल्या पाहिजेत.)

### बँकेच्या वापराकरिता

| | |
|---|---|
| अर्ज घेतलेला अधिकारी | |
| कार्ड क्रमांक | |
| कार्डाचा वापर सुरु तारीख | |

हुद्दा :- ____________

सही :- ____________

मॅनेजर/मुख्य कार्यकारी अधिकारी

# जयसिंगपूर उदगांव सहकारी बँक लि., जयसिंगपूर
## ए. टी. एम. कार्डासाठी अटी व नियम

१) खात्यावरील कमीतकमी शिल्लक ए.टी.एम. सवलत घेणाऱ्या ग्राहकाने त्याचे खात्यावर बँकेकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनेनुसार कमीत कमी शिल्लक रक्कम ठेवणे बंधनकारक आहे. सेव्हींग्ज खात्याबाबत सदरची मर्यादा रू. ५००/- व चालू खात्यासाठी रू. १०००/- इतकी राहील जर मर्यादेपेक्षा कमी रक्कम खात्यावर शिल्लक राहील तर दर पत्रकामध्ये आकार घेतला जाईल.

ग्राहकांनी त्यांचे खातेवरील कमीत कमी शिल्लकेबाबतची मर्यादा राखली पाहिजे सदरची अट ही ग्राहकांनी ए.टी.एम. कार्टाची सवलत चालू ठेवावयाची किंवा नाही याबाबत महत्वाची आहे. तथापि सदरची सवलत कोणत्याही प्रकारचे कारण न देता पुढे चालू ठेवणे अथवा काढून घेणेचा सर्वाधिकार बँकेने राखून ठेवला आहे.

२) **पैसे काढण्याबाबतची मर्यादा :-** ग्राहकांना प्रत्येक दिवशी त्यांचे खातेवरील जमा असलेल्या रक्कमेपैकी रु. १०,०००/- काढता येतील तथापि सदरची मर्यादा रक्कम वेळोवेळी ठरविली जाईल. सदरच्या मर्यादेचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन केलेस ए.टी.एम. कार्ड सवलत काढून घेतली जाईल.

३) प्रती खाते/प्रती ग्राहक ए.टी.एम. कार्ड सवलत :- ए.टी.एम. कार्ड नवीन रु. ५०/- व डुप्लीकेटसाठी रु. १००/- चार्जेस घेणेत येतील व सर्व्हिस चार्जेस प्रति वर्षी रु. ५०/- प्रमाणे आकारणेत येईल.

४) **जादा उचल केलेल्या खात्याबाबत :-** ए.टी.एम. कार्डधारकाने त्याचे खात्यात पुरेशी रक्कम असलेशिवाय पैसे काढू नयेत. खात्यात पुरेशी रक्कम आहे किंवा कसे याची खात्री करणेची जबाबदारी पूर्णपणे ग्राहकाची आहे. सदर कार्डधारकांच्या खातेवर किमान रक्कमेपेक्षा कमी रक्कम शिल्लक राहिल्यास अथवा ओव्हरड्राफ्ट झालेस किंवा कोणत्याही कारणाने येणे राहिलेस ती त्या खात्यावरुन सदरची रक्कम कार्डधारकाच्या खात्यावर जमा करणेचा हक्क बँकेस आहे. अशी रक्कम एक दिवसापेक्षा जादा काळ जमा झाली नाही तर सदर रक्कमेवर द.सा.द.शे. १५% प्रमाणे व्याज आकारले जाईल. याशिवाय प्रत्येक जादा उचल झालेची घटनेवेळी त्याबाबत बँक वेळोवेळी ठरवेल त्याप्रमाणे दंड आकारला जाईल.

५) **वैयक्तिक ओळख क्रमांक (पी.आय.एन.) :-** सर्व ग्राहकांनी ए.टी.एम.चा वापर सुलभ होणेसाठी, त्याचे वैयक्तिक ओळख क्रमांक निवडणे आवश्यक आहे. सदरचा ओळख क्रमांक हा गोपनीय असून, त्यामुळे ए.टी.एम. कार्डाचा वापर फक्त अधिकृत व्यक्तीलाच करता येईल. सदरचा ओळख क्रमांक कोणत्याही व्यक्तीस सांगू नये, किंवा दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीस सुगावा लागेल अशा ठिकाणी लिहू नये ओळख क्रमांक उघड करणे किंवा त्याच्या गुप्ततेबद्दलची पुरेशी सुरक्षा याबाबतची संपूर्ण जबाबदारी ग्राहकांची राहील. सदरचे ओळख क्रमांकाने केलेले सर्व व्यवहारांची जबाबदारी ग्राहकांची राहील आणि सदरचे व्यवहाराच्या नोंदी ह्या ग्राहकांवर बंधनकारक राहतील.

६) **संयुक्त खाते :-** संयुक्त खात्यावर ए.टी.एम. सवलत वापरुन केलेले सर्व व्यवहार हे सर्व संयुक्त खातेदारांवर वैयक्तिक आणि संयुक्तीकरित्या बंधनकारक राहतील.

७) **कार्डाची मालकी :-** सदरचे कार्ड ही बँकेची मालमत्ता असून, ही सवलत बँक कोणत्याही प्रकारचे कारण न देता काढून घेऊ शकते, रद्द करू शकते. अशा वेळी सदरचे कार्ड बँकेस परत करणेचे बंधन आहे. अशाप्रकारे कार्ड रद्द केलेनंतर कार्डचे शुल्क परत केले जाणार नाही.

८) **कार्ड हरविले/चोरीला गेले बाबत :-** जर ग्राहकाचे कार्ड हरविले किंवा चोरीस गेले तर अशावेळी ग्राहकांनी ताबडतोब बँकेस त्याबाबत लेखी कळविले पाहिजे. जर अशा कार्डावरुन कोणत्याही प्रकारचा व्यवहार झालेस आणि जर सदरचे कार्ड हरविलेबाबत किंवा चोरी झालेबाबतची कमीत कमी २४ तास पूर्व लेखी नोटीस व त्याबरोबर ए.टी.एम. कार्ड रद्द करणेबाबतची सुचना दिली नसलेस अशा व्यवहाराची संपूर्ण जबाबदारी खातेदारांचीच राहील. एकदा सदरचे कार्ड हरविले/चोरीस गेलेबाबत किंवा खराब झालेबाबत सुचना दिलेनंतर ते कार्ड परत सापडले तरी ते पुन्हा वापरता येणार नाही याची दखल ग्राहकाने घ्यावी.

९) **फी चार्जेस :-** सदरचे कार्डसंबंधी बँकेने ठरविलेली फी/चार्जेस रोखीने अगर कार्डधारकाच्या खात्यात नांवे टाकून वसूल केले जातील.

१०) **ए.टी.एम. मशिन :-** ए.टी.एम. हे यंत्र असून ते वापरत असताना काही वेळा चुका होण्याची शक्यता असते. ग्राहकाने बँकेस सदर यंत्राच्या वापरामुळे चुका झाल्यास त्याची भरपाई करून घ्यावी, तसेच तांत्रिक बिघाडामुळे मशिन बंद पडल्यास होणाऱ्या गैरसोयीस बँक जबाबदार राहणार नाही. ए.टी.एम. मशिन यांत्रिक चुकांमुळे/बिघाडामुळे होणाऱ्या चुकांमुळे पडणारी जबाबदारी तसेच वरील कलम ६ ते ९ मधील उल्लेख केलेल्या ए.टी.एम.च्या अधिकृत व्यवहारातून पडणाऱ्या जबाबदारीतून बँक पूर्णपणे मुक्त आहे. त्याची सर्वस्वी जबाबदारी ग्राहकांवर बंधनकारक आहे.

११) बँकेचे व्यवहार बंद झालेनंतर पैसे काढणेचे केलेले व्यवहार हे सदर ग्राहकांच्या खात्यावर दुसऱ्या कामकाजाच्या दिवशीच्या तारखेला व्हॅल्यु डेट म्हणून नोंद केले जातील.

१२) कार्डधारकास कोणत्याही प्रकारे पुर्व सुचना न देता सदर अटी/नियमाचे जादा अटी घालणे/वगळणे किंवा बदलणे बाबतचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. ए.टी.एम. कार्डधारकांनी ए.टी.एम. कार्ड घेतल्यानंतर सदरच्या अटी, शर्ती पुर्णपणे काळजीपूर्वक वाचल्या आहेत व त्यांचेवर बंधनकारक व त्यांना कबुल व मान्य आहेत असे समजण्यात येईल.

१३) विद्यार्थ्यांसाठी सेव्हींग खाती किमान रु. १००/- असणे आवश्यक आहे.

१४) ए.टी.एम. कार्डाची मुदत पाच वर्षे राहील.

१५) जर ग्राहकाच्या खात्यावर कोणतेही अनधिकृत व्यवहार दृष्टीक्षेपास ग्राहकास आल्यास त्या ग्राहकाने सदर बाबतची लेखी सुचना बँकेस त्वरीत देणे आवश्यक आहे.

१६) ए.टी.एम. मशिन मधुन कार्डाद्वारे दिलेली आज्ञा (Command) रद्द वा स्थगित करणेचा अधिकार कार्डधारकास नाही.

१७) कार्ड धारकाने स्वत:च धोका/अफरातफर, जाणेतपणी वा अक्षम्य निष्काळजीपणा केलेला असल्यास अशा बाबतीत सदरची रक्कम कार्डधारकांकडून देय राहील.

कार्डधारकाची सही